# मुंबई विद्यापीठ

परीक्षा विभाग/ निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०००९८.
परीक्षा विभाग/ ३१४२/ 2017
दि. ०७ सप्टेंबर, २०१७.

## परिपत्रक

विद्यापीठाच्या विविध विभागाचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालीत असलेल्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थेचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि–संचालक व विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक आपल्या निदर्शनास आणुन देण्यात येते की, एप्रिल–मे, २०१७ मध्ये घेतलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल नुकतेच जाहिर करण्यात आलेले आहेत. या जाहिर करण्यात आलेल्या परिक्षांच्या निकालांमध्ये विशेषत: M.A. (Part I & II) या परिक्षांच्या निकालांमध्ये काही विद्यार्थ्यांना काही विषयांमध्ये त्यांच्या संबंधित विषयांचे उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन न झाल्यामुळे निकाल जाहिर करण्यापुर्वी गुण प्राप्त नसल्यामुळे त्या संबंधीत विषयासमोर OOR असे दर्शविण्यात आलेले असुन; त्यांच्या निकालासमोर RR असा शेरा देवुन निकाल राखीव ठेवण्यात आलेले आहेत.

उपरोक्त बाबतीत नमुद करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांचे निकाल उपरोक्त प्रमाणे शेरा देवुन राखीव ठेवण्यात आलेले आहेत अश्या, सर्व विद्यार्थ्यांचे संबंधित विषयांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकनाची प्रकीया सुरू असुन; मुल्यांकन झाल्यानंतर या सर्व विद्यार्थ्यांचे निकाल शक्य तितक्या लवकर जाहिर करण्यात येतील.

तरी, आपण सर्वांनी उपरोक्त बाबींची नोंद घेवुन संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी व विद्यापीठ प्रशासनास सहकार्य करावे ही विनंती.

प्रा. (डॉ.) अर्जुन पी. घाटुळे)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत:

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालीत असलेल्या सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थेचे संचालक/प्रमुख, विद्यापिठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि–संचालक व विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक

प्रत माहीतीस्तव:–

१. मा.कुलगुरु यांचे कार्यकारी सचिव
२. मा.प्र–कुलगुरु व कुलसचिव यांचे स्वीय सहायक

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी:–

१. संचालक, संगणक सुविधा केंद्र, परीक्षा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग
३. उपकुलसचिव, पदवी व पदव्युत्तर विभाग मुंबई विद्यापीठ
४. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग